# पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांची पाणी वाचवा मोहीम.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पाणी बचतीचे महत्व पटवून देण्यासाठी पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी गुरूवार दि. १० सप्टेंबर, २०१५ रोजी शहरभर पाणी वाचवा मोहीम हाती घेतली. या मोहिमे अंतर्गत जगताप पाटील कॉम्पलेक्स्, पिंपळे गुरव येथे मा. महापौर सौ. शकुंतलाताई धराडे यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमास सुरूवात झाली. याप्रसंगी पॉलिटेक्निकच्या प्राचार्या सौ. व्ही. एस. ब्यॅकॉड याही सहभागी झाल्या. या कार्यक्रमाचे सुदर्शननगरमध्ये मा. शंकर जगताप यांच्या उपस्थितीत पार पडला. फुगेवाडी, कासारवाडी, एच. ए. स्कूल व भोसरी येथील नगरसेवक मा. श्री. नितिन लांडगे यांचा उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला व पिंपरी चिंचवड परिसरात या योजनेचे महत्व पटवून देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी पॉलिटेक्निकचे प्राध्यापक श्री. एम. एस. वाखारे, श्री. एम. एस. पवार, श्री. एस. डी. जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.